# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट ३९९-२०२४** **दिनांक :- २६/१०/२०२४**

## "जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात बोळींज पोलीसांना यश."

दिनांक २१/१०/२०२४ रोजी १५.४० वाचे सुमारास यशवंत अव्हेन्यु बिल्डींगचे पुढे, वाय.के.नगर, विरार ता. वसई जि. पालघर येथे फिर्यादी या त्यांची मुलगी व त्यांची मैत्रिण यांचेसोबत एक्स्पर्ट स्कुल येथुन राहते घरी पायी चालत जात असताना एक राखाडी रंगाची स्कुटी मोटार सायकल(क्रमांक माहिती नाही) वरुन एक हेल्मेट घातलेला पुरुष व एक स्कार्फ घातलेली महीला आरोपीत हे रस्त्याचे विरुध्द बाजूने समोरुन येवुन फिर्यादीजवळ थांबून त्यातील स्कुटी चालवणारे आरोपीताने त्याचे हातातील चिठ्ठीमध्ये लिहीलेला राहण्याचा पत्ता विचारण्यात फिर्यादीला व्यस्त करुन मागे बसलेल्या महिलेने तीचे गळयातील ६३,०००/- रुपये किंमतीचे ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावुन मानेवर दुखापत करुन आरोपीत हे मोटार स्कुटर वरुन पळून गेले आहेत. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन बोळींज पोलीस ठाणेस गु.र.क्र. I ११/२०२४, भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३०९(६), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

बोळींज पोलीस ठाणे हे नवनिर्मीत पोलीस ठाणे असून लोकांचे सुरक्षिततेबाबत व मालमत्तेचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. सदर गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहून आरोपीत यांचा पळून जाण्याचा मार्ग निश्चित करुन ते गेलेल्या दिशेचे जवळ जवळ ४० ते ५० सीसीटीव्ही कॅमेरे व तांत्रिक माहीतीच्या आधारे आरोपीत यांचे राहते ठिकाणाचा पत्ता मिळवून आरोपीत १) दिनेश हरेश्वर पारदले, वय ३८ वर्षे, ग्लोबलसिटी, विरार प., ता.वसई, जिल्हा पालघर, व त्यांची पत्नी वय २० वर्षे, रा.ग्लोबलसिटी, विरार प., ता.वसई, जिल्हा पालघर यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे विचारपूस करता, त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करुन आरोपीत यांचेकडे केलेल्या तपासात गुन्हयातील ६३,०००/- रुपये किमतीचे ८.८३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व गुन्हयात वापरलेली १,००,०००/- रु.किं.ची मॅट ब्लॅक रंगाची सुझूकी बर्गमन स्कुटी क्रमांक एम.एच.०२/एफ.क्यु.३३८४ असा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

वर नमूद गून्हयाचा तपास पो.उपनिरी./किरण वंजारी, बोळींज पोलिस ठाणे, मि.भा.व.वि.पोलीस आयूक्तालय हे करीत आहेत.

सदरची कामगिरी जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र लगारे, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली राजेंद्र तेंडुलकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, बोळींज पोलीस ठाणे, प्रकाश सावंत, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पो.उपनिरी./किरण वंजारी, पो. उपनिरी./विष्णू वाघमोडे, सफौ/९५०२० जनार्दन मते, पोहवा/०३०६२ किशोर धनु, पो.अं./१४०७६ रोशन पुरकर, पो.अं./१४१५९ प्रफुल सरगर यांनी केलेली आहे.

----oooo------